# मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत



# गिदोनाची लहान सैना

लेखकः Edward Hughes
रेखाचित्रकारः Janie Forest; Alastair Paterson
रूपान्तरकारः Ruth Klassen
अनुवादकः Rev. Shilas Gavit
निर्माताः Bible for Children
www.M1914.org

BFC
PO Box 3
Winnipeg, MB R3C 2G1
Canad
©2021 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.





यहोशवाच्या मृत्यू नंतर सर्व इस्त्राएल लोकांनी देवाच्या आज्ञा पाळल्या नाही आणि त्यांनी देवाला त्यांच्या जीवनात कोणतेही स्थान दिले नाही. शेजारच्या मिद्यानी लोकांनी इस्त्राएल लोकांच्या शेतातील पिकांना व घरांना आग लावावी

असे देवाने होऊ दिले. त्यामुळे इस्त्राएल लोकांना गुहांत राहावे लागत असे.


गिदोन नावाचा एक इस्त्राएली मनुष्य होता, त्याने गुप्तपणे गहू पिकविण्याची जागा शोधली असावी. तो एका मोठ्या झाडाखाली, द्राक्षकुंडांत गुप्त ठिकाणी गुप्तपणे गव्हाची मळणी करीत होता. मिद्यानी लोकांना त्या
ठिकाणाची माहिती नव्हती परंतू देवाला होती ! देवाने गिदोनासाठी एक संदेश घेऊन एका देवदुताला तेथे पाठविले.
3
त्याच्या बापाने बनविलेल्या दैवतांच्या मुर्त्यांचा गिदोनाने नाश करावा आणि खऱ्या देवाची वेदी बांधावी अशी देवाची इच्छा होती. त्याच्या गावातील लोक त्याला जीवे मारतील अशी भिती गिदोनाला असतांना देखिल गिदोनाने परमेश्वराच्या सांगण्याप्रमाणे केले.
4
दुष्ट मिद्यानांच्या विरुध्द् इस्त्राएली सैन्याचे गिदोनाने पुढारपण करावे अशी देखिल देवाची इच्छा होती. परंतू गिदोन घाबरला होता. देव त्याच्या बरोबर खरोखर आहे याचे विशेष चिन्ह त्याने मागितले. आणि मग त्याने जमिनीवर कातरलेली लोकर ठेवली.
5
मग गिदोन देवाला म्हणाला, "पाहा खळ्यांत कातरलेली लोकर ठेवतो व रात्री तिच्यावर मात्र दहिंवर पडून सर्व जमीन कोरडी राहिली तर तू आपल्या वचनाप्रमाणे माझ्या हस्ते इस्त्राएलाचा उध्दार करणार हे मला कळेल." सकाळी सर्व जमिन कोरडी होती, परंतू लोकर पिळून तिच्यातले दहिंवर बाहेर येईल एवढी ती ओली होती.
6
गिदोनाच्या मनात अजून शंका होती. आता देवाने सर्व जमिनीवर दव पाडावे पण लोकर मात्र कोरडी असावी अशी अपेक्षा केली. दुसऱ्या सकाळी – सर्व जमिन ओली होती परंतू लोकर मात्र कोरडी राहिली होती !
7
३२,००० सैन्यासह गिदोनाने सुरवात केली. देवाने त्या सैन्याला कमी करुन केवळ ३०० पुरुष ठेवले. "माझ्या स्वतःच्या हातांनी मला वाचवले आहे" असे इस्त्राएलांने म्हणावे अशी परमेश्वराची इच्छा नव्हती. केवळ परमेश्वरच इस्त्राएलांचा तारणारा होता.
32000
10000
300
8

गिदोन अजून देखिल भित आहे हे जाणून देवाने गिदोनाला, एक मिद्यानी सैनिक त्याचे विचित्र स्वप्न दुसऱ्या सैनिकाला सांगत असतांना ते गुप्तपणे एकण्याची संधी दिली. त्याने स्वप्नात असे पाहिले की, सातूची एक भाकर घरंगळत मिद्यानाच्या छावणीत येऊन पडली व तिने डेऱ्याला असा धक्का दिला की तो भुईसपाट पडला.



9

हे ऐकून त्याच्या सोबतीचा पहारेकरि फार घाबरला. "हि गिदोनाची तलवार होय..." असे तो म्हणाला. गिदोनाने जेंव्हा ते स्वप्न व त्याचा अर्थ ऐकला, तेंव्हा त्याला कळून चुकले की परमेश्वर त्याला विजय देईल.



10

गिदोनाने रात्रीचा हल्ला करण्याचे ठरविले. त्याने प्रत्येक सैनिकाकडे एक तुतारी दिली, आणि रिकामे घडे दिले त्या घड्यांच्या आंत दिवट्या ठेवल्या. त्यांनी मिद्यानी सैन्याला चारि बाजूंनी घरले.



11

गिदोनाने इशारा केल्यावर, सैनिकांनी त्यांच्या रणशिंगांचा मोठ्याने आवाज केला, त्याच्या हातातील घडे फोडून टाकले व त्या घड्यांतील दिवट्यांचा प्रकाश दिसू लागला. कित्ती भयंकर आवाज ! कित्ती भयंकर घोटाळा ! घाबरलेले मिद्यानी झोपेतून उठून पळून गेले.



12

या मोठ्या विजया नंतर, इस्त्राएल लोकांनी गिदोनला राज्य करण्यास सांगितले. गिदोन त्यांना म्हणाला, "मी तुमच्यावर अधिकार गाजविणार नाही...परमेश्वरच तुमच्यावर अधिकार गाजविल." लोकांच्या जीवनावर केवळ परमेश्वरच अधिकार गाजवू शकतो हे गिदोनाला माहित होते.



13

गिदोनाची लहान सैना

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

शास्ते ६-८

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

14




15

60



बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर परमेश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची अशी इच्छा आहे की आम्ही त्याला ओळखावे.

परमेश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मरण आहे, पण परमेश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याला तुमच्या पापांची शिक्षा मिळावी आणि वधस्तंभावर मरावे म्हणून त्याच्या एकुलता एक पुत्र येशू याला पाठविले. नंतर येशू जिवंत झाला आणि स्वर्गातील घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

हे सत्य आहे यावर जर तुम्ही विश्वास ठेवता, तर परमेश्वराला हे सांगा:
प्रिय येशू, तू परमेश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मरण पावण्यास मनुष्य बनला आणि आता तू जिवंत आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांची मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एके दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी येईन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि परमेश्वराशी रोज बोला! योहान 3:16